लेखक: वि. [illegible]. गर्दे



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9209

BVBK-0401271

बालाजी प्रकाशन

# गोष्ट एका भालूची

( एका अभागी मुलाची रोमहर्षक चित्तवेधक कथा )

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. .... दिनांक ......
विषय क्र. ........

## लेखक : विष्णू त्र्यंबक गर्दे

BVBK-0401271

## बालाजी प्रकाशन

— आंतरराष्ट्रीय बालक वर्षानिमित्त प्रकाशन —

प्रकाशन तारीख : ~~ललिता पंचमी २६।९।७९~~

1 0 OCT 1980

प्रथम आवृत्ति प्रती – १०००

हया कथेच्या पुढील आवृत्तींचे, पुनर्मुद्रणाचे, रुपांतराचे भाषांतराचे, नाट्य चित्रपट रुपांतराचे सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

प्रकाशक :–

**बालाजी प्रकाशन**

सुपर मार्केट, सोलापूर.

मुद्रक :–

**तिरुपती प्रिंटर्स**

सुपर मार्केट, सोलापूर.

# गोष्ट एका भालूची

अविनाशनें तरुण वयात नव्या कॉलनीत बंगला बांधला. त्याची बायको **निर्मला** हिने पण नोकरी करुन त्याला हातभार लावला. नुकतीच त्यानें आपल्या बंगल्याची वास्तुशांत चांगल्या प्रकारे साजरी केली होती. त्याने वास्तुशांतीला आपल्या मित्रांना नातेबाईकाना, आपल्या आणि निर्मलाच्या कचेरीतल्या लोकांना आणि कॉलनीतल्या सर्वांना बोलाविले होते.

एखाद्याच्या घरी काही खाणेंपिणे झाले, की तेथून परतताना ज्याच्या घरी खाणेपिणे झालेले असते त्याच्यावर बरी-वाईट टीका ही करायचीच असा लोकांचा स्वभाव असतो. त्याप्रमाणें काहीजण म्हणाले, 'बटाटेवड्याचा आकार जरा लहान होता.' तर काहीजण म्हणालें, 'बर्फीत साखर जास्त होती, बहूदा स्वस्त दराची आणलेलीं असावी.' तर एकजण, ज्याला अजून बंगला बांधणे जमले नव्हते, तो अविनाशने बंगला बांधला त्याबद्दल मत्सर वाटून म्हणाला, 'अविनाशने बंगला बांधला ह्यात काही नवल नाही. दोघेजण नोकरी करतात आणि अजून त्यांना मुलबाळ झाले नाही. शिवाय ही कॉलनी गावापासून इतकी दूर आहे कीं एकदा बंगल्यात राहायला आल्यावरच अविनाशला कळेल काय त्रास असतो ते. त्यापेक्षा आपली गावातली लहानशी आणि भाड्याची जागा का असेना पण जास्त सोयीस्कर आहे.' त्यावर

दुसरा म्हणाला, 'पण दोघे जरी नोकरी करीत असले तरी त्यांनी पैसा साठवून लहान वयात बंगला बांधला ह्यात त्यांचे कौतुकच करायला पाहिजे आणि कॉलनी जरी गावापासून थोडी लांब असली तरी गावतल्या कोंदट आणि अडचणीच्या जागेत राम्हण्यापेक्षा कॉलनीत राहण्याचे आजकाल धाडस केलेच पाहिजे',

त्यावर पहिला कुचेष्टेनें म्हणाला, 'तुम्हाला फराळाची एक ताटली जास्त मिळालेली दिसते आहे.'

ती कॉलनी गावापासून दूर होती. एका हमरस्त्याच्या खूप आत ती कॉलनी वसलेली होती. त्यामुळे कॉलनीच्या पुढच्या बाजूला मोकळे मैदान होते. तर मागच्या बाजूला लांबच लांब शेते पसरलेली होती. आणि विशेष म्हणजे अविनाशचा बंगला मागच्या बाजूच्या कडेला होता. कारण त्याचा बहुधा त्या सोसायटीच्या चिटणीसाकडे वशीला नसावा.

त्या बंगल्यात रहायला येण्यात अविनाशनें एक प्रकारे धाडस दाखविले होते हे मात्र खरे.

त्या कॉलनीत रहायला आल्यानंतर अविनाशला काही दिवसांनी मुलगा झाला. लग्नानंतर चार पाच वर्षांनी अविनाशला मुलगा झाला. तेव्हा हा नव्या बंगल्याचा पायगुण असे जो तो म्हणू लागला. नव्या बाळाचा जन्म अविनाशच्या सासूरवाडीला म्हणजेच, निर्मलाच्या आईकडे झाला होता. मुलगा झाल्याची तार अविनाशच्या कचेरीच्या पत्त्यावर आली होती. त्यामुळे ती बातमीं कचेरीतल्या सर्वांना लागलीच समजली. सर्वजण त्याच्या भोवती जमले आणि पेढे मागू लागले. कारण इतरांना एखाद्याचे चांगले झाल्याबद्दल आनंद वाटण्याऐवजी आता आपल्याला हमखास फुकटचे पेढे खायला मिळणार ह्याचाच आनंद वाटतो. अविनाशनें तावडतोब चपराशाला पाठवून पेढे मागविले आणि कचेरीतल्या सर्वांना वाटले.

निर्मलाच्या आई-वडीलानी बाळाचे बारसे खूप थाटात साजरे केलें. निर्मलाच्या सासरचे आणि माहेरचे बहुतेक सर्व नातेवाईक बाळाच्या बारशाला हजर होते. अविनाशच्या वडि-लांचे नाव भालचंद्र होते. म्हणून बाळाचें नाव भालचंद्र ठेवले. अर्थात् बाळाला घरातली लहानमोठी माणसे भालू म्हणून हाक मारु लागली. अविनाशची आई मात्र त्याला बाळ म्हणत असे.

भालूचे सर्व जण खूप लाड करीत असत. तो जरासा मोठा झाल्यावर निर्मला त्याला घेऊन आपल्या घरी आली. बाळ लहान म्हणून आणि निर्मला नोकरीवर जाणार म्हणून त्यांच्याबरोबर अविनाशची आई आली होती. अविनाशची आई तशी वयस्कर होती. परंतु निर्मलाने स्वयंपाक आणि धुण्या-भांड्यासाठी बाई ठेवलेली असल्यामुळे निर्मला नोकरीवर गेल्यावर तिला बाळावर लक्ष ठेवावे लागत असे.

भालूच्यामुळे प्रत्येक येणाऱ्या सणाला नवा अर्थ आणि आनंद मिळत होता. निर्मला आणि अविनाश कचेरीतून परत येताना आपआपल्या मनानें नित्य नवी खेळणी भालूसाठी आणत असत. त्यामुळे खेळण्याचे एखादे दुकान काढता येईल इतकी खेळणी जमा झालेली होती.

भालू आता रांगायला लागला होता. त्यामुळे तो बंगलाभर रांगत रांगत फिरत असें. अविनाशची आई नातवाच्या रांगण्याचे कौतुक म्हणून अविनाशला म्हणाली, 'अविनाश तुला वाटत असेल आपण खूप मोठा बंगला बाधला म्हणून. पण बाळ रांगायला लागल्यापासून तो बंगला फारच लहान वाटायला लागला आहे. लौकरच घरातल्या कपबशांची संख्या दुप्पट होईल. खाली म्हणून कांही ठेवण्याची सोय नाही. कॉलनीतल्या मुलांच्यात भालू हा सर्वांत लहान होता. शिवाय तो कुणाही ओळखीच्या माणसाकडे जात असे. कोणीही त्याला उचलून घेतले तरी तो अजिबात रडत

नसे. उलट त्याला कोणीही बाहेर नेले म्हणजे तो अगदी खुशीत असे. त्यामुळे कॉलनीतले कुणीही केव्हाही घरातल्या लोकांना सांगून त्याला आपल्या घरी नेत असत. त्याबद्दल कौतुक म्हणून निर्मला आपल्या सासूबाईनां म्हणाली," भालूचें येवढे बरीक बरे आहे, की तो कोणाच्याही बरोबर जायला तयार असतो.' त्यावर तिच्या सासूबाई म्हणाल्या, ' पण असे चांगले नाही. वेळ काळ कांही सांगून येत नसतात.'

निर्मला कचेरीत जाताना भालूचे पटापट मुके घेत असे. आणि त्याने जरासा हात सहज जरी हलवला तरी आपल्या सासूबाईनां म्हणत असे, 'पाहिलेत का बाळ मला कसा ' टाटा ' करतो आहे ते?' एके दिवशी नेहमी प्रमाणें निर्मलानें ऑफिसला जाताना बाळाचे पापे घेतले. ती जरा पुढे गेल्यावर भालूने तोंड वेडेवाकडे केले म्हणून ती पुन्हा माघारी फिरली आणि त्याचे पापे घेऊन म्हणाली, ' आज मी बाळाला घ्यांयला लवकर येणार आहे.' त्यावर भालू ती काय म्हणाली हे न समजले तरी खूदकन हसला आणि मग निर्मला ऑफिसला गेली.

निर्मला त्या दिवशी जरा लवकरच ऑफिसातून बाहेर पडली. कॉलनीत शिरल्यावर तिला आपल्या बंगल्याचे मागचे दार उघडे असल्याचे दिसले. त्यांचा बंगला कडेला होता. आणि त्याच्या मागच्या बाजूला शेते होती. त्यामुळे निर्मलाच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. ती घरी आल्यावर तिने दारावरची घंटा वाजवली पण आतून तिच्या सासूबाईची ' ओ ' ऐकू आली नाही म्हणून ती जरा थांबली आणि मग तिने पुन्हा जोराने दारावरची घंटा वाजवली. तरीही तिला आपल्या सासूबाईची ' ओ' आली नाही की त्या उठून बाहेर येत असल्याची चाहूल लागली नाही. आणि मग मात्र ती जास्तच घाबरली.

भीतभीतच पण नाइलाजाने ती बंगल्याच्या मागच्या दारानें

आत गेली. ती आत जाऊन पहाते तर सासूबाईना गाढ झोप लागलेली तिला दिसले. त्यांच्या शेजारी बाळाचे दुपटे आणि दुलई पडलेली होती. पण बाळ काही तेथे नव्हता. ते पाहून ती जास्तच घाबरली. तिने भीडभाड सोडून आपल्या सासूबाईंना गदागदा हलवले. आणि मग मात्र त्या जाग्या झाल्या अणि उठून बसल्या. निर्मला त्यांना घाबऱ्याघाबऱ्या म्हणाली, 'बाळ कुठे आहे?'

सासूबाई थरथर कापत म्हणाल्या, ' म्हणजे काय ? बाळ घरात नाही? त्याला शांत झोप लागली म्हणून मी त्याच्या अंगावर दुलई घालून त्याच्या शेजारी डुलकी आली म्हणून पडले. तोच मला गाढ झोप लागली. जरा उकडत होते. म्हणून वाऱ्यासाठी मागचे दार उघडे टाकले. ' आणि मग निर्मला जास्तच कावरीबावरी झाली ती हुंदके देऊन रडू लागली. तशा सासूबाई तरातरा उठल्या आणि तिला म्हणाल्या, ' थांब जरा मी आपल्या कॉलनीत कोणी बाळाला नेले आहे का ते विचारुन येतें. इतक्यातच धीर सोडू नकोस.'

सासूबाई कॉलनीतल्या सगळ्या घरी बाळ आहे का म्हणून विचारून आल्या आणि कोणाच्याच घरी बाळ नाही हे समजल्यावर त्या घरी ज्या आल्या त्या मटकन खाली बसल्या आणि त्यांची शुद्ध हरपली. तेवढ्यात कॉलनीतल्या बायका तेथे आल्या. एकीकडे निर्मला ढसाढसा रडत होती तर दुसरीकडे तिच्या सासूबाई बेशुद्ध पडलेल्या होत्या. हे दृश्य पाहून काय करावे हे कुणालाच समजेना. जरा वेळाने काही बायका निर्मलाजवळ बसल्या.

कांही बायका सासूबाईच्या तोंडावर गार पाणीं मारून आणि त्यांना कांदा हुंगायला देऊन त्यांना शुद्धीवर आणावयाच्या प्रयत्नाला लागल्या. तर कांहीजणी बाळ कॉलनीत कोठे दिसतो आहे का तें इकडे तिकडे शोधू लागल्या.

तेवढ्यात अविनाश कामांवरुन आला आणि इतर पुरुष पण आले, झालेला प्रकार त्यांना समजल्यावर त्यांच्यापैकी कोणी

डॉक्टरांना बोलवायला गेले, कोणी पोलीसांना बोलवायला गेले, तर काही जण पाठीमागच्या शेतात बाळाचा शोध घ्यायला म्हणून गेले. एक दोघेजण अविनाशला धीर द्यायला म्हणून थांबले. थोड्याच वेळात पोलीसांची गाडी आली. डॉक्टरही आले. पोलीसांनी आग विझविणाऱ्या लोकांना शिडी घेऊन यायला सांगितले होते त्याप्रमाणें तेही पण आले.

डॉक्टरनी सर्व माहिती विचारुन घेतली आणि निर्मलाला झोपेची गोळी दिली. सासूबाईना औषध दिले. फौजदारांनी आग विझविणाऱ्या लोकांना आसपासच्या विहिरींत बाळाचा कसून तपास करावयाला सांगितले आणि पोलीसांना सबंध कॉलनी आणि पाठीमागची शेते येथे बाळाचा कसून शोध घ्यायला सांगितलें.

मग फौजदार कॉलनीतल्या लोकांना म्हणाले, 'ह्या कॉलनीत कोणी बाहेरचे लोक कधी फिरकत होते का ? ' त्यावर एकदोन बायका म्हणाल्या, ' चारपाच दिवसापूर्वी कॉलनीत एक साधू येऊन गेला. भाजीवाले फेरीवाले अधून मधून फिरकत असतात.'

फौजदारांनी विचारले, 'कॉलनीत धुणे भांडी करणाऱ्या मोलकरणी कोण आहेत? त्या कुठे रहातात?'

बायका म्हणाल्या, ' सर्व कॉलनीत एकच मोलकरीण काम करते. तिला आम्ही कॉलनीतच एक झोपडी रहायला बांधून दिली आहे. आज दुपारी सर्वांची कामे आटोपल्यावर ती एकटीच झोपडीत गेलेली आम्ही पाहिली.' जरा वेळ विचार करुन फौजदार म्हणाले, ' आज दुपारी तुम्ही, पुरुष कामाला गेल्यावर काय करीत होतात?' बायका म्हणाल्या, ' नेहमीप्रमाणे जेवण आटोपून सामानाची आवराआवर करून आम्ही आपापल्या बंगल्यांची दारे आतून बंद करून थोडावेळ वाचन करुन झोपलो होतो.'

फौजदार मग निर्मलाच्या सासूबाईना म्हणाले, 'आजी बाई, तुम्ही झोपला तेव्हा बाळ तुमच्या जवळ होते का?' आजी म्हणाल्या, 'बाळाला झोप लागली म्हणून मी त्याला अंथरुणावर झोपविले. माशा त्याला त्रास देतील म्हणून मी त्याच्या अंगावर पांघरुण घातले, फार उकडत होते म्हणून वारा यावा म्हणून पाठीमागचे दार उघडे ठेवले. जरा झोप काढावी म्हणून मी सतरंजी टाकून बाळाच्या शेजारीच जरा आडवी झाले कशी कुणास ठाऊक पण मला मेलीला गाढ झोप लागली. निर्मला घरी आली आणि तिने मला गदागदा हलविले तेव्हांच मी जागी झाले.'

फौजदार जरावेळ विचार करुन म्हणाले, 'बाळाला परक्या माणसाने घेतल्यावर ते त्याच्याकडे रहात होते का रडत होते ?' आजीबाईच्या डोळयात पाणी आलं आवंडा गिळून त्या म्हणाल्या, 'बाळ कोणाकडेही जात असे. कोणी अनोळखी माणसाने त्याला उचलून घेतले तर ते रडत नसे. त्याला कुत्र्याची सुद्धा भीती वाटत नसे. कुत्रा जवळ आला तर बाळ त्याला हात लावत असे'

त्यावर फौजदारानी विचारलें, 'बाळ रांगत होते का?' आजीबाई म्हणाल्या, 'हो, अगदी बंगलाभर रांगत होता. मला झोप लागल्यावर फार तर मागच्या दारापर्यन्त गेला असेल. पण तिथेच झाडावर इकडून तिकडे उडणाऱ्या चिमण्या पहात बसला असेल. त्याला तशी सवय होती. पण बाळ पाठीमागच्या दाराच्या पायऱ्या उतरणे शक्य नाही. त्याला कोणी तरी मेल्याने उचलूनच नेले असले पाहिजे.'

आणि मग फौजदार जास्तच गंभीर झाले. त्यांनी मग अविनाशला कोणाचा संशय येतो का असे विचारले. अविनाशने आपल्याला तसा कोणाचा संशय येत नसल्याचे सांगितले.

पोलीसांनी सारी शेते पिंजून काढली आग विझवणाऱ्यांनी विहिरीच्या तळापर्यन्त जाऊन पाहिले. पण कोणालाच बाळ कांही सापडले नाही. फौजदार मग अविनाशला म्हणाले, ' आम्ही शोधाच्या कामात कसलीही कसूर करणार नाही ह्याची तुम्ही खात्री बाळगा. येतो आम्ही.'

डॉक्टरांनी औषधासंबंधी अविनाशला कांही सूचना दिल्या आणि ते जाताना म्हणाले, ' रात्र अपरात्र असली तरी जेंव्हा केव्हा जरुर लागेल तेव्हां बोलवा. मी येईन.'

दुसरे दिवशी अविनाश आणि निर्मला ह्यांच्या कचेरीतील लोकांना हे समजल्यावर ते सर्वजण समाचाराला येऊन गेले. अविनाश व निर्मला ह्यांच्या आई-वडिलांना कॉलनीतल्या लोकांनी तारा केल्या होत्या म्हणून तें पण आले. मग काही दिवसांनी अविनाशच्या वडिलांनी सर्वांना आपल्या कडे नेलें. जागा बदलली तरी अविनाशचे विशेषतः निर्मलाचे दुःख कमी झालेले नव्हते. सांत्वनाच्या वरच्या मलमपट्टीने मनाला खोलवर झालेली जखम लौकर बरी होत नसते. त्यातून बाळ आहे का कायमचा नाहीसा झाला आहे, असला तर कोठे असेल हे निश्चित माहित नसल्या-मुळे ती मनाची जखम वहाती होती. बाळाचा जन्म आणि त्याचे नाहीसे होणें ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. पण एका बाजूवर उत्कट सुखाचा शिक्का होता, छाप होता, तर दुसऱ्या बाजूवर तीव्र दुःखाचा काटा होता, कामात असले म्हणजे तेवढाच दुःखाचा विसर पडतो म्हणून काही दिवसांनी निर्मला आणि अविनाश कामावर रुजू झाले. त्या गोष्टीला आता पाच सहा वर्षे लोटली होती. अजून भालूचा शोध लागलेला नव्हता. अजून निर्मला रात्री अपरात्री बाळाच्या आठवणीने दचकून जागी होत असे. बाळ नाहीसे झाले पण त्याची आठवण नाहीशी झालेली नव्हती.

पण भालूचा तसा शोध लागणें शक्य नव्हते. कारण भालूला कोणा माणसानें पळवून नेलेच नव्हते. त्या दिवशी कॉलनीतल्या बायका आपापल्या बंगल्यात आतून दारे लावून शांत झोपलेल्या होत्या. त्यामुळे कॉलनीत सर्वत्र सामसूम होती. तेव्हां जरावेळाने भालू उठला. दार उघड होते म्हणून तो दाराच्या कडेपर्यंत रांगत रांगत गेला. तेथे मागच्या अंगणातील पेरुच्या झाडावर बसून चिमण्या चिवचिव करत होत्या. त्यांच्याकडे कौतुकाने पहात भालू बसला होता. इतक्यात शेतात आलेल्या एका लांडग्याने त्याला पाहिले. जवळपास कोणी नाही ह्याची खात्री करुन घेऊन पाय न वाजवता तो लांडगा भालूच्या जवळ आला आणि त्याने भालूला अलगद उचलून घेतले. लांडगा भालूला, थेट आपल्या जंगलातल्या गुहेंत घेऊन गेला. लांडगिणीपुढे त्यानें अभिमानाने आपण आणलेली नवी शिकार म्हणजेच भालूला आपटलें. भालूला पाहून लांडगिणीने, लांडगा त्याला हात लावण्यापूर्वीच, प्रेमाने उचलून घेतले.

लांडगिणीने लांडग्याला, भालूला अजिबात इजा करायची नाही, भालूला हात सुद्धा लावायचा नाही .असे बजावले. तिनें भालूचे पटापटा मुके घेतले. त्याला प्रेमाने कुरवाळले. लांडगिणीला अजून पिल्ले झालेली नव्हती. त्यामुळे तिनें आईच्या प्रेमाची पाखर भालूवर घातली. त्याचे चांगल्या प्रकारे पालन-पोषण करायचे ठरवले. प्रथम प्रथम ती भालूला फळे चावून त्यांचा रस देत असे. मग ती लुसलुशीत फळे त्याच्यासाठी जंगलातून आणून त्याला खायला द्यायला लागली. आणि मग तो जरा मोठा झाल्यावर ती कठीण फळे पण त्याला द्यायला लागली. मधून मधून ती मऊसे मास पण त्याला देत असे.

तेवढ्यात लांडगिणीला पिल्लं झाली होती. पण म्हणून तिची भालूवरची माया काहीं कमी झाली नव्हती.

भालूनें रांगण्याच्या अवस्थेनंतर उभे राहण्याचा फारसा प्रयत्न केला नव्हता. आणि आता तर तो लांडगिणीच्या त्या पिल्लात खेळायला लागल्या पासून त्यांच्या सारखाच हाता पायावर चालत असे. फक्त पायाच्या ऐवजी गुडघे जरा टेकवून तो चालत असे. त्यामुळे भालूच्या तळहातांना आणि गुडघ्यांना घट्टे पडून ते मजबूत झाले होते. मात्र जंगलात चालताना त्याच्या हातांना गुडघ्यांना काटे बोचत असत. तो जरी लांडग्याच्या पिल्लांच्यापेक्षां वयाने मोठा होता तरी त्यांच्या बरोबर पळताना तो त्यांच्या खूप मागे रहात असे. लांडग्याच्या पिल्लांची आपआपसात खेळताना केव्हां केव्हां मारामारी होत असे. पण भालू हा जरी त्यांच्यात खेळत असला तरी हमरीतुमरीवर कधीच येत नसे. भाडणाचे प्रसंग तो कटाक्षानें टाळत असे. कारण त्या पिल्लांच्यापेक्षा आपल्यात कमी ताकद आहे ह्याची त्याला जाणीव होती. जेवायच्या वेळी लांडग्याची पिल्ले आपल्या भक्षावर तुटुन पडायची. त्यावेळी त्यांच्यात भांडणें व्हायची. पण अशा वेळी भूक लागलेली असून सुद्धा भालू शांत बसून रहात असे. एखादे वेळी एखाद्या पिल्लांचा पंजा भालूला लागायचा भालू मग रडत बसायचा. लांडगिणीला हे समजल्यावर आपल्या पिल्लाला ती मारायची, भालूला प्रेमानें जवळ घ्यायची. सर्वात जास्त अशक्त मुलावर आईची माया जास्त असते. भालू आपल्या पिल्लापेक्षा जास्त अशक्त म्हणून त्याला ती जास्त माया लावत अस.

सकाळच्या वेळी समोरच्या टेकडीतून वर येताना सूर्य तांबडा लाल दिसत असें. त्यावेळी त्याचा तांबडा रंग आणि आकाशाला आलेला लालीमा फारच छान दिसत असे. भालू गुहेच्या बाहेर एकटाच बसून त्याकडे बराच वेळ टक लावून बघत असे त्याचप्रमाणें संध्याकाळच्या वेळी सूर्य पाठीमागच्या

टेकडीच्याआत नाहीसा होत असे. त्याकडे पण भालू बराच वेळ पहात बसत असे. संध्याकाळी पाठीमागच्या टेकडीच्या आत शिरलेला सूर्य दुसरे दिवशी समोरच्या टेकडीतून कसा बाहेर पडतो हे एकदा पाठीमागची टेकडी वर चढून प्रत्यक्ष पहावे असे त्याच्या खूप मनात होतें. पण पाठीमागची उंच टेकडी चढून जाणे त्याला आजवर कधीच जमले नव्हते.

लांडग्याच्या पिल्लांच्या बरोबर तो जवळच्या नदीवर जाऊन पाणी पीत असे, नदीच्या पाण्याने अंग स्वच्छ करत असे. उन्हाळयात तो पिल्लांच्या बरोबर जवळच्या नदीत डुंबत पण असे एकदा तो नदीत पाय घसरुन पडला आणि नदीच्या प्रवाहा बरोबर वाहत चालला होता. तेवढयात लांडग्याच्या पिल्लांनी त्याला पाहिले. आणि वर काढले. तेंव्हांपासून भालू नदीच्या काठावर बसूनच पाणी प्यायचा, अंघोळ करायचा, अगदी आत जायला घाबरत असे

भालू लांडग्याच्या पिल्लांच्या नादाने आणि त्यांच्या संगतीत त्यांच्या सारखेच आवाज काढून बोलायचा. त्याला माणसांची भाषा येत नव्हती. त्यामुळे त्याला आपल्या शिव्याही माहित नव्हत्या आणि ओव्याही माहित नव्हत्या. माणसांची भाषा तो शिकणार कोणापासून आणि बोलणार कोणाशी ?

भालूचे केस खूप वाढलेले होते. मात्र त्याच्या अंगावर लांडग्याच्या पिल्लाच्यासारखे केस नव्हते त्याची कातडी पण पिल्लांच्या सारखी जाड नव्हती त्यामुळे रात्रीच्यावेळी त्याला खूप थंडी वाजायची. त्यामुळे त्याला रात्री झोपही नीट लागायची नाहीं. अशावेळी तो लांडगीणीच्या कुशीत झोपायचा आणि मगच त्याला उब वाटायची. गुहा जंगलातच होती. म्हणून रात्रीच्या वेळी रानातल्या पशुंचे रडणे ओरडणे त्याच्या कानठळया बसवत असे. त्यामुळें पुष्कळदा तो झोपेतून दचकून उठत असे. पण पुढे पुढे त्याला ह्याचीही सवय झाली. तो पशुंच्या ओरडण्याने दचकून

झोपेतून उठत नसे. रात्री झोपण्यापूर्वी भालूला निर्मलाची आपल्या आईची आठवण येते असे त्यामुळे तो रोज निजताना थोडावेळ रडत असे. पण लांडगिणीने जरा थोपटल्यावर त्याला झोप लागायची

गुहेला एक झरोका होता. त्यातून पौर्णिमेच्या चंद्राची किरणें आत येऊन लख्ख चांदणें पडले म्हणजे भालूला खूप मौज वाटायची. पण विजांचा कडकडाट झाला म्हणजे तो घाबरुन लांडगिणीला बिलगायचा आणि पिल्ले त्याला हसायची. भालू आता सात एक वर्षाचा झाला होता. त्याला आता कोणत्या शाळेत म्हणजे इंग्रजी माध्यमाच्या का मराठी माध्यमाच्या का देणगी मागणाऱ्या चांगल्या शाळेत घालावा असा प्रश्न लांडगिणीला पडलेला नव्हता त्याला आपल्या पिल्लाप्रमाणेंच प्रत्यक्ष जीव-नोपयोगी शिक्षण म्हणजे आपले भक्ष्य कसे शोधावे, शिकार कशी करावीं, ह्याचे शिक्षण त्याला द्यावे असे तिला वाटत होते. पण तिला हे माहित होते की; भालू आपल्या पिल्लांच्या इतका चपळही नाही की ताकदवानही नाही, त्यांच्या प्रमाणे त्याच्या अंगात रग नाही. भालूचें दात आणि नखे आपल्या पिलांच्या प्रमाणें तीक्ष्ण नाहीत. त्यामुळे तिला अशी भीति वाटत होती की हा जर शिकारीला गेला तर ह्याचीच शिकार व्हायची. जगलीं प्राणी उलट ह्यालाच मारायचे. त्यामुळे एकाद्या आईला आपल्या अपंग मुलाची जशी काळजी वाटते तशी भालूची तिला काळजी वाटत होती. कारण भालू हा चपळ नव्हता, ताकदवान नव्हता, त्याचे दात आणि नखे तीक्ष्ण नव्हती. त्यामुळे तो शिकार करायला लायक नव्हता

उद्या आपली पिल्ले मोठी झाल्यावर ती शिकारीसाठी बाहेर पडतील. मग भालूला कोणाच्या विश्वासावर गुहेत एकटा ठेवायचा असा तिला प्रश्न पडलेला होता. भालूच्या साठी स्वत:

घरी रहाणे पण तिला शक्य नव्हते. कारण तिने स्वत: शिकार करून आणल्या शिवाय तिला भालूला त्यातला वाटा देता आला नसता. तिला सर्वात जास्त भीति अशी वाटत होती की आपली पिल्ले भुकेच्या पोटी भालूची केव्हा शिकार करतील ह्यांचा मुळीच नेम नव्हता. एके दिवशी लांडगिणीला, भालूला घरी ठेऊन बाहेर जाणे भाग पडले. त्याआधी दोन तीन दिवस लांडग्याला विशेष मोठी शिकार मिळालेली नव्हती. जेमतेम कसेबसे सर्वांचे पोट भरले होते. सकाळपासून पिल्ले भुकेजली होती. म्हणून शिकार शोधण्यासाठी लांडगिणीला बांहेर पडणे भाग होते. पिल्लांना बाहेर पिटाळून आणि भालूला आंत ठेऊन ती गुहेच्या बाहेर पडलीं. ती गेल्यावर काहीवेळानें पिल्लांच्या पाठोपाठ भालूही गुहेच्या बाहेर पडला. कारण त्याला आत एकटे बसावयाचा कंटाळा आला होता. त्याला भूक ही लागली होती.

संध्याकाळी लांडगीण आणि लांडगा मारलेली मेंढी घेऊन आले. ते पाहून त्यांची पिल्ले त्यांच्या भोवती जमली. पण भालू त्यांच्याबरोबर नव्हता. लांडगीण घाबऱ्या घाबऱ्या गुहेत गेली. आत जाउन पाहते तर तेथे भालू नव्हता. तिला संशय आला म्हणून तिने आपल्या पिल्लांच्या तोंडाचा वास घेतला. त्यावरून तिची खात्री पटली की त्यांनी भालूला मारून खाल्ले नव्हते. भूक लागलेली असून सुद्धा पिल्लांनी मेंढीचे लचकें तोडले नाहीत की त्यासाठी भांडाभांडी केली नाही. उलट ती कावरीबावरी होऊन केविलवाण्या नजरेने आपल्या आईकडे पाहू लागली. त्यावरून लांडगिणीने ओळखले, की भालू दिसत नसल्याचे दु:ख त्यानाही झाले आहे. लांडगीण खूप दमली होती तरी भालूचा शोध घेण्यासाठी इकडे तिकडे वणवण हिंडली. ती नदीवर गेली, टेकडीच्या आसपास सर्व जागा धुंडाळून आली. त्यादिवशी सकाळी झाडावर हिरवे हिरवे पोपट बसले होते. त्यांच्या कडे कौतुकाने

पाहात भालू बराच वेळ गुहेच्या बाहेर बसून होता. तिने त्या झाडाकडे एकवार केविलवाण्या नजरेने पाहीले. झाड शांतपणे काहीएक हालचाल न करता जागच्याजागी उभे होते. त्यावरचे पोपट केव्हांच उडून गेले होते. रात्र झाली तशी लांडगीण निराशेने गुहेपाशी आली. तिने एक करुण किंकाळी फोडली. गुहेने तशीच साद दिली. जणूकाही भालू नाहीसा झाला, तो आपल्याला आता परत दिसणार नाही ह्याचे गुहेलाही दुःख झाले होते.

त्या रात्री लांडगीण जेवली नाही. रात्रभर भालूच्या आठवणीने ती रडत-ओरडत होती.

गुहेकडे तोंडकरून लांडगीण रोज म्हणायची, 'गुहे गुहे मला सांग! भालूचा केव्हा लागेल थांग!' तिला गुहा समजवणीच्या स्वरात म्हणायची,'लांडगीणी लांडगीणी आता भालू! असला साद नको घालू! 'गुहेचे म्हणणे खरे होते कारण लांडगीणीला भालू साप-डणे शक्य नव्हते. त्यादिवशी लांडगीण बाहेर पडल्यावर जरा वेळाने जो भालू बाहेर पडला तो तिच्या पिल्लां बरोबर एका बागेत गेला. सर्वांना भूक लागलेली असल्यामुळे पिल्लांनी आणि भालूने बागेतील फळावर भरपूर ताव मारला. जरा वेळाने बागेच्या माळ्याची चाहूल लागल्यामुळे सर्वजण बागेतून पसार झाले. ते सर्वजण पळत पळत गुहेकडे यायला निघाले. अर्थातच भालू सर्वांच्या मागे होता. इतक्यात त्यांच्या मागे एक शिकारी लागला. जो तो आपला जीव बचावण्यासाठी शक्य तितक्या जोरात पळत होता. लांडग्याची पिल्ले मात्र शिकाऱ्याच्या हाता-तून सही सलामत सुटली. पण भालू मात्र शिकाऱ्याच्या हातात सापडला. हा विचित्रप्राणी कोण असावा ते अंधारामुळे त्याला समजणे शक्य नव्हते. गर्द झाडीतून बाहेर पडल्यावर हा

म्हणूनच असावा, ह्याची त्याला खात्री पटली. शिकाऱ्याने त्याला आपल्या गावातल्या झोपडीत नेले. जंगलात इतकी मोकळी जागा असताना ह्या येवढ्या टीचभर जागेत इतकी माणसे का राहतात असा भालूला, ती झोपडी पाहून प्रश्न पडला.

शिकाऱ्याने झोपडीच्या एका कोपऱ्यात भालूला पटकून दिले. शिकाऱ्याची बायको त्याला म्हणाली, 'ही कसली आणली शिकार तुम्ही!' शिकारी म्हणाला, 'मी लांडग्याच्या पिल्लांचा पाठलाग करत होतो. हा त्यांच्या बरोबर होता. लांडग्याची पिल्ले पळून गेली आणि हा मात्र मागे राहिला. हा थोडाच त्यांच्या इतका चपळ रहाणार आहे?'

शिकाऱ्याची बायको म्हणाली. 'पण मग तुम्ही ह्याला कशाला बरोबर आणलेत? हा माणसासारखा दिसतो आहे ह्याचा शिकार म्हणून काय उपयोग होणार आहे ?'

त्यावर शिकारी म्हणाला, 'हा माणूस आहे, ह्याचा काहीच उपयोग नाही, हे मला माहित आहे' त्यावर शिकाऱ्याची बायको रागावून म्हणाली, 'मग ह्याला कशापायी आणलेत तुम्ही? आधीच आपल्याकडे खाणारी तोंडे जास्ती झालेली आहेत. त्यांच्यात ही भर कशापायी घातलीत? ते काही नाही. घरात ही अडगळ नको'

शिकारी शांतपणे म्हणाला, ' जंगलात हा एकटाच होता. कोणी जंगली जनावराने ह्याला पाहिले असते तर ह्याला खाल्ले असते. म्हणून मी ह्याला बरोबर आणले.'

भालूच्या दंडाला धरुन त्याला दूर लोटत शिकाऱ्याची बायको म्हणाली, ' मग आत्ताच्या आत्ता ही व्याद घराबाहेर काढा. ह्याला खायला घालणार काय आणि झोपवणार कुठे? तुम्हाला नाहीतरी नसत्या गोष्टीचा पुळका येतो.'

शिकारी आपल्या बायकोला समजवणीच्या स्वरात म्हणाला, ‘ ह्या पोरक्या पोराला रातचा बाहेर टाकणे बरे नव्हे. मी उद्या त्याचा बंदोबस्त करतो. आजच्या रातला मी माझ्यातली थोडी, भाकर कुमकरुन घालतो. आणि त्याला अंगावर घेऊन झोपतो’ लांडगिणीनें आपल्याला प्रेमाने जवळ घेतले होंते. ती, आपल्याला कुरवाळत होती. तसे प्रेम काही आपल्याला दोन पायावर चालणाऱ्या बाईने दाखविले नाही. उलट आपल्याला दंडाला धरुन दूर लोटून दिलं, हा नवा अनुभव भालूला आला. पण त्याला काय माहित की पशूप्रमाणे माणसांना आजकाल खाण्यापिण्याच्या आणि जागेच्या राहण्याची सुबत्ता नाही आणि म्हणून त्यांचा प्रेमाचा झरा आटलेला आहे.

रात्री भालूला शांत झोप लागली. झोपडीबाहेर लाऊड स्पीकर वर लागलेली गाणी जंगलीपशूंच्या ओरडण्यापेक्षा जास्त कर्कश आणि निरर्थक वाटली म्हणून केवळ नव्हे. त्याला झोप न येण्याचे कारण म्हणजे त्याला जोपडीत कसला तरी घाण वास येत होता, मोकळा वारा न आल्याने उकडत होंते, ढेकूण डास सारखे चावतहोते. आणि विशेष म्हणजे त्याला प्रथम निर्मलाची आणि नंतर लांडगिणीची आठवण येऊन रडू कोसळलें. भालूला पहाटे झोप लागली. नंतर तो जागा झाला तेट्रँझीस्टर वर लागलेल्या हिंदी गाण्यांनी. त्यावेळी शिकाऱ्याची मुले हाव भाव करून नाचत होती. शिका-याची बायको हातातल्या झाडणीने ठेका धरत होती. भालू कावरा बाबरा होऊन ट्रँझीस्टर कडे पहात होता. कुणी कडून गाण्याचा आवाज येतो आहे ते त्याला समजत नव्हते. भालू उटून तो ट्राँझीटर उलथा पालथा करू लागला. तेवढ्यात शिकाऱ्याच्या मुलांनी त्याच्या हातातून तो हिसकाऊन घेतला आणि ती म्हणाली ‘काटां ढलेंल अन् गानं बिघडेलना.’ शिकाऱ्याच्या मुलांनी फाटक्या चड्डया आणि भोक पडलेले फाटके बनीयन घातले होते.

भालूला ते पाहूत गंमत वाटली. त्याला काय माहित, त्या फाटक्या कपड्यातून त्यांची गरिबी डोकावत होती. मुलांची शरीरे धुळीने, माखलेली होती. भालूच्या मनात विचार आला, ही मुले नदीच्या पाण्यात डुंबून अंग स्वच्छ का करत नाहीत?

मुलांनी खायला मागितले म्हणून त्यांच्या आईने त्याना, धपा धपा मारले. भालूला भीति वाटली की आपल्यालाही आता मार खावा लागणार. म्हणून तो कोपऱ्यात उभा राहीला. शिकाऱ्याच्या बायकोने एकवार भालूकडे रागाने पाहिले आणि शिकाऱ्याला ती म्हणाली, ' आता तरी काढा लौकर ही नसती ब्याद झोपडीबाहेर. तुम्हाला नसते चोचले सुचतात तरी कसे?"

शिकारी शांतपणे म्हणाला" मी त्याच खटपटीत आहे." भालूला ते काय म्हणत होते हे जरी समजले नाही तरी ते आपल्याविषयीच बोलत असावेत हे मात्र समजले. तो हळूच मुलांच्या मागोमाग झोपडीबाहेर सटकला.

भालूचे आता काय करावे ह्या विचारात शिकारी असतानाच एका दरवेशाने भालूला पाहिले. इतर मुलापेक्षा हा खूप वेगळा आहे. हे त्याने ओळखले. तो झोपडीच्या दारात बसलेल्या शिकाऱ्याला म्हणाला, '-हा पोरगा तुम्हाला कुठे गावला ?" शिकारी म्हणाला, ' मी जंगलात शिकारीला गेलो असता लांडग्याच्या पिल्लांच्या संग खेळतांना हा मला सापडला'

हा आपल्याला मिळाला तर फार बरे होईल अशा विचाराने दरवेशी म्हणाला, ' तुम्हास्नी ह्येचा काय उपयोग? शिकारी म्हणाला, ' मला ह्याचा कांहीच उपयोग नाही.' दरवेशी म्हणाला, ' मंग मला विकत द्या की'. शिकाऱ्याने दरवेशाच्या म्हणण्याला होकार दिला. मग, पैशाबाबत थोडीशी घासाघीस केल्यावर दरवेशाने दहा रुपयाला भालूला विकत घेतला. भालूने

आपल्याला जाता जाता पैसे मिळवून दिले म्हणून शिकाऱ्याच्या बायकोला आनंद झाला. ती दरवेशाला म्हणाली, ' नीट संभाळा हं ' भालूला दरवेशाच्या स्वाधीन करताना शिकाऱ्याच्या डोळ्यांत पाणी आले. तो दरवेशाला म्हणाला, 'ह्या बिचाऱ्याला कोणीतरी बहुतेक,लांडग्याने त्याच्या आईबापाच्या घरातून पळवून नेले असावे. कारण हा ओणवा चालतो, लांडग्यासारखे आवाज काढतो. माझ्या-मागे मुलांचे लेंढार नसते तर मीच ह्याचा संभाळ केला असता. म्हणून म्हणतो ह्याला नीट संभाळ.' आणि मग दरवेशी भालूला घेऊन गेला. भालू दिसेनासा होईपर्यंत शिकारी त्याच्याकडे पहात होता. आणि मग तो स्वतःशीच पुटपुटला, 'ह्याच्या आई बापाने ह्याच्याकडे लक्ष दिलेनाही म्हणून पोराची अशी परवड झाली.'

दरवेशाने भालूला घरी आणल्यावर तो आपल्या बायकोला म्हणाला, ' ह्याला मस्तपैकी खायला घाला. चार गावी हिंडण्या फिरण्याची आणि कसरत करण्याची ह्याच्यात ताकद यायला हवी.'

भालूला पाहून दरवेश्याची बायको आश्चर्याने म्हणाली. 'ह्याला कसरत करायला लावणार तुम्ही?' पण हा तर धड अस्वलही नाही अगर माकडही नाही. हा तर माणसासारखा दिसतो आहे. फक्त चालण्या ऐवजी हा रांगतो इतकेच, काय ते. दरवेशी म्हणाला, ' हा माणूसच आहे. पण लांडग्याच्या पिल्लांच्या सहवात राहिल्यामुळ हा रांगतो. त्यांच्या सारखे आवाज काढतो. त्यांच्या सवयी ह्याला लागल्या आहेत. त्यामुळेच ह्याला पहायला गर्दी लोक करतील. हा कसरतीत तयार तर होऊ दे मग तू पहात राहशील हा कसा पैसा मिळवून देतो ते. '

आपल्यापुढे कोणते ताट वाढून ठेवले आहे. ह्याची भालूला काळजी वाटत होती. आणि मग त्याला निर्मलाची आणि लांड-गिणीची आठवण येऊन त्यांच्या डोळ्यात पाणी आले. दरवेशाने

भालूला नवीन कपडे शिवले. तो भालूला खायला प्यायला चांगले देत असे. पण त्याला कसरत करायला जरा जरीं जमले नाही तरी भालूला बदम मारत असे. भालूला हें सारे सहन करणे भाग होते. सध्यातरी दुसरे गत्यंतर नव्हतें. तो एकटा असला म्हणजे रडत बसत असे. दरवेशी मोठा कलाक होता. त्याने मनोरंजक आणि पाहाणाऱ्याला हसू येईल असे खेळ भालूला शिकवले. बायको रुसली तिच्यासाठी साडी आण, बायको नोकरीवरुन घरी आली तिच्यासाठी चहाचा कप आण, वगैरे गमतीचे खेळ शिकवले आणि मग दरवेशी भालूला घेऊन मुंबईला गेला. भालू आगगाडी आणि तिच्यातील गर्दी पाहून अगदी कावरा बावरा झाला. कारण ह्या गोष्टी तो प्रथमच पहात होता. त्याला वाटले इतकी माणसे आपल्या डब्यातच का शिरत आहेत? पण त्याला काय माहीत की प्रत्येक डब्यातच तेवढी गर्दी होती आणि आगगाडीचा शोध लावणाऱ्याने गर्दी कमी करण्याचा शोध लावलेला नव्हता

मुंबईला उतरल्यानंतर तिकीट तपासनीसांने इतक्या माणसात दरवेशाला नेमके अडवले. दरवेशानें भालूचे अर्धे तिकीट काढले होते. तपासनीस त्यांचेपूर्ण तिकीट मागू लागला. निष्कारण त्रास नको म्हणून दरवेशनें त्याच्याहातावर एक नोट ठेवली व तो भालूला घेऊन स्टेशनच्या बाहेर पडला. दरवेशाने दुपारची थोडी विश्रांती घेतली आणि मग संध्याकाळी तो भालूला घेऊन चौपाटीवर गेला. भालूला त्याने नवीन शिवलेलाबुशकोट आणि चड्डी घातली होती. वाटेत त्याला छोटचा छोटचा घरात ठेचून भरलेली माणसे दिसली. त्याच बरोबर मोठ्या बंगल्यात थोडी माणसे रहात असलेली दिसली. त्याला वाटले, छोटचां बंगल्यात इतक्या मांणानी राहण्यापेक्षा ही माणसे कमी माणसे रांहत असलेल्या मोठचां बंगल्यांत का राहायला जात नाहीत ? प्रशस्त बंगल्याच्या आसपास असलेली झोपडपट्टी पाहून त्याला गंमत

वाटली. त्याला मुंबईच्या वस्तीचे दोन रंगी चित्र पहायला मिळाले होते. भालूने माणसांचे घोळकेच्या घोळके इकडून तिकडे जाताना पाहिले. त्यांची घाई गर्दी पाहून त्याला प्रश्न पडला की इतकी माणसे येथे कोठून आली आणि इथेच का जमली? इतक्या घाई गर्दीने हे कोणाची शिकार करायला निघाले आहेत? त्याला काय माहीत की ही आपण होऊनच मुंबईच्या जीवनाची शिकार झालेली आहेत म्हणून. मात्र इतकी माणसे भालूच्या जवळून गेली तरी कोणीही त्याच्याकड ढुंकुन सुद्धा पाहिले नाही, कोणीही त्याला फिदीफिदी हसले नाही की मुलांनी त्याला दगड मारलें नाहीत. जो तो आपापल्या व्यवसायात दंग होता हे पाहून भालूला बरें वाटले. चौपाटीवर पोहोचल्यावर दरवेशाने लागलीच एका जागेवर आपले सामान मांडले आणि डमरु वाजवून लांडग्याने पळवून नेलेल्या मुलाचे कसरतीचे खेळ पहा म्हणून पुकारा केला. लाग–लीच लोकांची गर्दी जमली. मुलें आपल्या आई-वडिलांना हाताला धरुन ओढत ओढत तेथे आणत होती. लोक भालूला आणित्याचे खेळ पाहून खूष झाले. दरवेशानें थाळी फिरवल्यावर तिच्यात लोकानी खूपपैसे टाकलें. काही मुलांनी आपल्या जवळचा खाऊ आणि फळे भालूच्या पुढयांत टाकली. दरवेशानें खाऊ आणि फळे गोळा करुन थोडी फळे भालूला देऊन बाकीच्यावर आपण स्वत: ताव मारला. खिशात पैसे खुळखुळत होते म्हणून फळांचा भरपूर रस घेतला आणि फळांचा थोडासा रस भालूला दिला. भूक लागली होती म्हणून आणि जवळ पैसे खुळखुळत होते. म्हणून चौपाटी वरची भेळ भरपूर खाऊन त्यांने आपली बऱ्याच दिवसापासूनची इच्छा तृप्त केली. तो शहाळ्यातले पाणीप्यायला.

सकाळी पाव मिसळ संध्याकाळी भेळ, पाणीपुरी, फळांचे रस हे पदार्थ खाऊन कांदा भाकरीची सवय असलेल्या दरवेशाचें समाधान होईना. इतके दिवस हे पदार्थ दुसऱ्यानें खाल्लेले ऐकून

त्याच्या पोटात दुखत होते. आता ते पदार्थ खाऊन त्याच्या पोटात दुखू लागले, त्याला बरे वाटेना. त्यामुळें पैसे बरे मिळत असूनही त्याला लौकरच मुंबईचा मुक्काम हलवावा लागला. दरवेशी भालूला घेऊन दुसऱ्या मोठ्या शहरात गेला. जे रवीला दिसत नाही ते कवीला दिसते. आणि जे कवीला सुद्धा दिसत नाही ते वर्तमान पत्राच्या बातमीदारांना दिसते. भालू आपल्या शहरात आल्याची बातमी त्यांना समजली. त्यांनी दरवेशाची मुलाखत घेऊन त्याच्या कडून भालूसंबंधी सर्व माहिती घेतली. भालुचे फोटो काढले आणि दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात, लांडग्याने पळवून नेलेल्या मुलाचे आपल्या शहरात आगमन झाल्याचीं बातमी प्रसिद्ध केली.

दुसरे दिसशीच्या वर्तमानपत्रात भालू बद्दलची बातमी वाचून लोकांच्या झुंडीच्या झुंडीं भालूला. पहायला जाऊ लागल्या. लाग-लीच वर्तमानपत्रात पत्र आले की, लोकांची खुप गर्दी होतें म्हणून जादा बसेस् सोडण्यात याव्यात. लोकांच्या गर्दीच्या मानानें फारसे पैसे दरवेशाला मिळालें नाहीत तरी पोटा पुरते पैसे मिळाले. पाकीट माऱ्यांना त्याच्यापेक्षा जास्त पैसे मिळाले. एक दोन दिवसात त्या शहरात दोन परिसंवाद ठेवण्यात आले. पहिल्या परिसंवादाचा बिषय होता, ह्या विचित्र मुलाला कोल्ह्याने पळवून नेले असावे का लांडग्याने? आणि दुसऱ्याचा विषय होता, हा मुलगा परत माणसात येईल का? परिसंवादातील प्रत्येक वक्ता हा दुसऱ्याला मूर्ख म्हणत होता. आणि म्हणून श्रोत्यांना तर मग ह्या वक्त्यांपैकी शहाणा कोण असा प्रश्न पडलेला होता.

तेवढ्यात वर्तमानपत्रात नागरीकांची दोन पत्रे प्रसिद्ध झाली. पहिल्या पत्रात फक्त येवढेच म्हटले होते की, कुणातरी बाईनें तिला नको असलेले मुल जंगलात टाकून दिले असेल, ते दरवे-शाला मिळाले असेल. ते लांडग्यानें पळवून नेलेले मुल नसावे. तर

दुसऱ्या पत्रात, 'पोलीस ह्याची चौकशी करतील काय?' ह्या मथळ्या खालीं नागरीकांने लिहिले होंते, कदाचित दरवेशाने स्वतःच्या मुलाचे केस वाढवून त्याला पशू सारखे चार पायावर चालावयाला शिकवले असेल व तो लांडग्यानें पळवलेला मुलगा असे खोटेंच सांगत असेल तरी पोलीसांनी नीट चौकशी करावी आणि नागरिकांची फसवणूक होणार नाही ह्याची काळजी घ्यावी. कुणीतरी वर्तमानपत्रातल्या दुसऱ्या पत्रातला मजकूर त्या दरवेशाला सांगीतला. आणि तो ऐकून उगीचच आपल्यामागे पोलीसांच्या चौकशीचा त्रास नको म्हणून घाबरून दरवेशाने आपला त्या शहरातला मुक्काम हलवला, तेथून तो दुसऱ्या गावी गेला. वर्तमानपत्रातली भालू संबंधी आलेली बातमी वाचून भालूला पहाण्याची उत्सुकता आधी होतीच. तशीच त्याला पहाण्याची संधी आपल्याला अनायासे मिळाली म्हणून खूप लोक त्याला पाहायला जमले. परंतु गर्दीच्या मानानें दरवेशाच्या थाळीत पैसे फारच थोडे जमले. ह्या गावातले लोक पैसे खर्च करण्याच्या बाबतीत फारच चिक्कू असल्यामुळे मोठ्या मूष्कीलीनें त्यांनी एक दोन पैशाची नाणी दरवेशाच्या थाळीत टाकली. मुलांनी तर दरवेशाच्या थाळीत पैसे टाकण्याऐवजी भालूला चोरून दगड मारले.

थाळीत फारच थोडे पैसे जमले म्हणून दरवेशाने स्वतः फक्त पोटभर खाल्ले. पण भालूला मात्र अर्धपोटी ठेवले. दरवेशाला ज्या दिवशी भरपूर पैसे मिळायचे त्या दिवशीच फक्त भालूला पोटभर खायला मिळायचे. एरवीच्या दिवशी भालूला उपासमार काढावी लागायची. भालूला बरे असो नसो किंवा तो दमलेला असला तरी दरवेशाच्या माराच्या धाकानें त्याला नाइलाजाने कसरतीचे खेळ करावे लागत. भालूनें त्या बाबतीत जरा जरी अंग चुकारपणा केला तरी दरवेशी त्याला, कसलाही

विचार न करता बेदम मारत असे. दरवेशी हा भालूकडे निव्वळ पैसे मिळवायचे साधन म्हणून पहात असे. शहाणा माणूस आपल्या यंत्राला सुद्धा जास्त ताण देत नाही. त्याला तेल वेळच्या वेळी देत असतो. दरवेशाने भालूला माणूसकीनें वागवलें नाही. लांडगीणी इतकी तर नाहीच पण शिकाऱ्या इतकी मायाही भालूला लावली नाही. फार काय, आपल्या ह्या पैसें मिळवायच्या साधनाला भरपूर खायला प्यायला घातले नाही की त्याला विश्रांती पण दिली नाही.

भालूला माणसाची भाषा बोलता येत नव्हती आणि त्याला माणसाची भाषा बोलता आली असती तरी दरवेशाच्या धाकाने तो आपले दुःख लोकांना सागू शकला नसता. लोकाना भालूमधला विचित्रपणा दिसत होता। पण त्यांचे दुःख लोकांना दिसत नव्हते. लोकाच्या मनात भालूला कोणा तरी बाईने नको असलेला मुलगा म्हणून जंगलात टाकून दिलेला असेल अशी शंका आली. पण इतकी कल्पना शक्ति असलेल्या माणसाला भालूसारख्या लहान आणि पोरक्या मुलाला कसरतीचे खेळ करायला लावून दरवेशी त्याचा छळ करतो आहे ह्याची कल्पना आली नाही.

भालूने जीवनाला वैतागून काय वाटेल ते करुन आणि काय वाटेल ते झाले तरी, दरवेशाच्या तावडीतून सुटका करुन घेण्याचा ठाम निश्चय केला. तो फक्त अनुकूल संधीची वाट पहात होता.

एके दिवशी दरवेशी, दुपारच्या वेळी भालूला एका झाडाला बांधून, चहा प्यायला म्हणून गावा बाहेरच्या कोपऱ्यावरच्या हॉटेलात गेला. तेवढ्यात भालूने जवळचा अणकुचीदार दगड उचलून झाडाच्या बूंध्यावर आपल्या गळ्याभोवतीचा दोर ठेचून तोडला. आणि तो जवळच्या वाटेने पसार झाला. दरवेशी निवांतपणी चहा पीत पुढच्या मुक्कामाला कोठे जायचे ह्याचा विचार करत होता. बऱ्याच वेळाने दरवेशी आपल्या जागेवर

येऊन पहातो तर त्याला भालू तेथे दिसला नाही. त्याच्या पोटात धस्स झालें. भालूला कोणी तरी पळवून नेले असावे असे दरवेशाला वाटले. म्हणून त्यानें गावाकडच्या रस्त्यावरच्या दुकानदाराकडे चौकशी केली. पण त्याला भालूचा काहीच शोध लागेना. म्हणून नाइलाजाने दरवेशानें पोलीस चौकीवर, भालूचे सर्व सविस्तर वर्णन देऊन त्याला कोणीतरी पळवून नेले असावे अशी फिर्याद दिली. पोलीस त्याला म्हणाले, 'इतक्या विचित्र वर्णनाच्या मुलाचा आम्ही नक्कीच लौकर शोध लावू. तुम्ही निर्धास्त रहा. तुमचा पत्ता आमच्याजवळ आहेच. तुम्हाला त्याचा शोध लागल्यावर नक्की कळवू.'

मग दरवेशी खिन्न मनाने एकटाच आपल्या घरी परतला. त्याला भालू आपल्याला सोडुन गेल्याबद्दल वाईट वाटले नाही तर आपले पैसे मिळविण्याचें साधन गेले म्हणून वाईट वाटले.

भालू जंगलात शिरणार इतक्यात पाठीमागून एक मोटार येत होती म्हणून तो जरा बाजूला झाला. तेवढ्यात मोटारीतील लोकांनी त्याला पाहिले व आपली मोटार थांबविली. मोटार एका शहरातल्या प्राणीसंग्रहालयाची होती. मोटारीतून दोघे तिघे खाली उतरले. भालूच्या दिशेने ते येऊ लागले म्हणून तो पळू लागला, परंतु त्यांनी धावत जाऊन त्याला पकडले. त्यांना चावण्याचा, त्यांच्या हातातून निटूसन जाण्याचा, भालूने प्रयत्न करुन पाहिला. परंतु त्या लोकांनी त्याच्या तोंडात, तो चावू नये म्हणून कापडाचा बोळा कोंबला व त्याला घट्ट धरुन ठेवले. त्यांच्या मुख्य अधिकाऱ्याच्या सांगण्यावरुन भालूला मग मोटारीतून प्राणी संग्रहालयात नेण्यात आले. आणि तेथें त्याला रिकाम्या पिंजऱ्यात ठेवण्यातआले. बिचारा भालू आगीतून फुफाट्यात पडला होता. आपल्या नशीबात काय काय लिहिले आहे हे जाणून घेण्यासाठी पिंजऱ्याच्या गजावर आपले कपाळ आपटत होता.

सकाळ संध्याकाळ स्त्री-पुरुष, मुले, प्राणी-संग्रहालयात इतर प्राण्याच्यां बरोबर, शेवटच्या पिंजऱ्यात ठेवलेल्या भालूलाही पहात असत. पण त्याला पूर्वी लांडग्याने पळवून नेले होते हे त्यांना माहित नसल्यामुळे त्याच्याकडे कोणीही विशेष उत्सुकतेने पहात नसे. फार काय पण प्राणी-संग्रहालयात कोणालाहीते माहित नव्हतें. एके दिवशी एक परदेशी प्रवासी प्राणी-संग्रहालयात प्राणी पहायला आला होता. तो भालूच्या पिंजऱ्याजवळ आला असता खोडकर मुलांनी भालूला दगड मारल्यामुळे भालू विचित्र आवाज काढून ओरडला. ते ऐकून त्या प्रवाशाला आश्चर्य वाटलें. त्यानें भालूचे बारकाईने निरीक्षण केले, जरा वेळ विचार करुन तो प्रवासी प्राणी-संग्रहालयाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या कचेरीत गेला आणि त्याला म्हणाला, 'मी प्राणीशास्त्राचा अभ्यासक आहे. तुमच्या-कडे शेवटच्या पिंजऱ्यात माणसासारखा दिसणारा परंतु पशुसारखा चालणारा, ओरडणारा, शेपूट नसलेला जो प्राणी आहे तो आमच्या अमेरिकेतल्या प्रयोग शाळेला विकत दिल्यास तुम्हाला भारी किंमत मिळेल. तुमची तयारी असेल तर मी आमच्या प्रयोगशाळेच्या अधिकाऱ्यांना विचारतो.' मग तो जरा थांबून हळूच म्हणाला, 'तुम्हाला पण ह्या व्यवहारात भरपूर कमिशन मिळेल.'

ते ऐकून मुख्य अधिकाऱ्याने कमिशनच्या लालसेनें त्या परदेशीं प्रवाशाच्याम्हणण्याला होकार दिला.

असेच एके दिवशी एक जोडपे ते प्राणीसंग्रहालय पहायला आले होते प्राणी पहातापहाता ते दोघे भालूपाशी आले. भालूला पाहून लागलीच नवरा पुढे गेला. पण बायको मात्र तेथेच थांबली. ती भालूचे बारकाईनें निरीक्षण करू लागली. तेवढ्यात भालूनें सहजा सहजी वर तोंड करुन पाहिले. भालूची आणि त्या बाईची दृष्टादृष्ट झाली. लागलीच भालू नाचायला लागला. तो पिंजऱ्याच्या पुढच्या बाजूला आला. आणि त्याने आपला एक हात

पिंजऱ्याच्या गजातून पुढे केला. लागलीच त्या बाईनें त्याचा हात आपल्या हातात घेतला. आणि ती एकदम ओरडली, ' भालू'

ते ऐकून त्या बाईचा नवरा मागे वळून भालूच्या पिंजऱ्याजवळ आला. ते जोडपे दुसरे तिसरे कोणी नसून अविनाश आणि निर्मला हेच होते.

निर्मला मग अविनाशला म्हणाली, ' हा आपला भालूच असला पाहिजे. त्याचे नाक, डोळे, जिव्हणी, ओठाची ठेवण सारे सारे थेट भालू सारखे आहे. तुम्हाला नाही वाटत तसे ?

अविनाशला इतका विचित्र दिसणारा मुलगा जरी त्याचे लहानपणीच्या भालूशी साम्य असले तरी तो आपला मुलगा असावा असे वाटणे शक्य नव्हते. कारण बापाला आपला मुलगा चांगला दिसावा, दिसतो ह्याचा फक्त अभिमान वाटत असतो. त्या अभिमानाला जरा जरी धक्का लागला तरी हा मुलगा आपला असू नये, नसावा असे साहजीकच वाटत असते. ह्या उलट आईला आपला मुलगा कसाही दिसत असला तरी केवळ आपल्या पोटी जन्माला आला आहे ह्या जाणीवेने त्याच्याबद्दल आपूलकी, प्रेम वाटत असते. भालू पार बदलून गेला असता तरी निर्मलानें त्याला पाहाता क्षणीच ओळखले असते. कारण आई ही आपल्या मातेच्या हृदयाचे डोळे करून आपल्या मुलाला पहात असते, कान करून त्याचे बोबडे बोल कौतुकानें ऐकत असते.

जिथे राम, लव–कुशांना, आपल्या मुलांना ओळखू शकला नाही तिथे अविनाशची काय कथा ? आणि म्हणून निर्मलानें सांगून सवरूनही तो पिंजऱ्यातील मुलगा आपला भालू असावा, असे अविनाशला मुळीच वाटले नाही म्हणून तो शांतपणें निर्मलाला म्हणाला, ' लहानपणी पाहिलेला भालू मला आता इतक्या वर्षांनी आठवत नाही, हा कदाचित् भालूसारखा दिसत असेल. पण हा आपला भालू नाही हे निश्चित. तुला तसा भास झाला असेल.'

त्यावर निर्मला रडकुंडीला येऊन म्हणाली, ' तुम्हाला काहीच कसे वाटत नाही हो? हा आपला भालूच आहे.'

अविनाशने निर्मलाची समजूत घालायचा खूप प्रयत्न केला. पण काहीच उपयोग झाला नाही. मग प्राणीसंग्रहालय बंद व्हावयाची वेळ झाली म्हणून त्यांना नाइलाजाने तेथून बाहेर पडावे लागले. दुसरे दिवशी तेथे जाण्याच्या बोलीवर मोठ्या मुष्कीलीने अविनाशने निर्मलाला घरी आणले. परंतु घरी गेल्यावर निर्मला भ्रमिष्ठासारखी करु लागली. कॉलनीत तमाशा नको म्हणून अविनाशने मानसोपचार करणाऱ्या आपल्या डॉक्टर मित्राला फोन करुन बोलावले.

डॉक्टर आल्यावर अविनाशने त्यांना सर्व हकीगत सांगीतली. ती ऐकून डॉक्टर गंभीर झाले, विचारमग्न झाले. त्यांना प्रश्न पडला होता, भालू नाहीसा होऊन इतकी वर्षे झालीं मग एकाएकी असा भास होईल का? भालूत आणि ह्या प्राणीसंग्रहातल्या मुलात जर खूपच साम्य असले तर असा भास होऊ शकणार नाही का? पण मग हा निर्मलाताईना निव्वळ भास झालेला असेल असे मानावे तर त्या मुलाने निर्मलाबाईला पाहून आनंदाने उड्या का माराव्यात हे समजत नाही. जरा वेळ विचार करून डॉक्टर अविनाशला म्हणाला, ' मी आत्ता पुरते निर्मलाताईना झोपेचे औषध देतो उद्या तुम्ही मी आणि निर्मलाताई त्या मुलाला प्रत्यक्ष पाहू. मगच मी सांगेन काय ते.'

दुसरे दिवशी ते तिघे प्राणीसंग्रहालयात गेले. प्रथम डॉक्टर त्या मुलाजवळ एकटेच गेले. त्याने डॉक्टरांच्याकडे वर मान करून पाहिले नाही. नंतर एकट्या अविनाशला पाठवल्यावर पण तोच अनुभव आला. नंतर एकट्या निर्मलाताईला पाठवल्यावर मात्र तो आनंदाने नाचू लागला त्याने आपला एक हात बाहेर काढला.

निर्मलाने लागलीच ' भालू ' म्हणून प्रेमाने त्याचा हात आपल्या हातात घेतला तेवढ्यात रखवालदार तेथे आला. तो अविनाशला म्हणाला, काल रात्री हा सारखा रडत ओरडत होता. आता त्या डॉक्टरची शंभर टक्के खात्री झालेली होती की हे दोघे मायलेक असोत वा नसोत, पण दोघाना एकमेकाची इतकी ओढ आहे की त्यांना एकत्र आणल्याखेरीज निर्मला आणि हा मुलगा सुखी होणार नाहीत की ताळ्यावर येणार नाहीत. म्हणून डॉक्टरनी अविनाशला तो मुलगा प्राणी संग्रहालयाकडून विकत घेण्याचा सल्ला दिला. प्रथम अविनाश त्याला तयार होईना. त्यावर डॉक्टरनी, नाहीतर निर्मलाबाईंना निश्चितच वेड लागेल असे सांगीतल्यावर तो तयार झाला.'

दुसरे दिवशी अविनाश आणि डॉक्टर प्राणीसंग्रगालयाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या कचेरीत गेले. त्यावेळी दरवेशी तेथे आला होता. कोठून कुणास ठाऊक पण दरवेशाला आपल्या तावडीतून सूटलेला भालू प्राणीसंग्रहालयात आणलेला आहे अशी बातमी लागलेली होती. दरवेशी मुख्य अधिका-यास म्हणत होता, 'एकदा एक शिकारी जंगलात शिकारीसाठीं गेला असता त्याला लांडग्याच्या पिल्लांच्या बरोबर खेळत असलेला एक मुलगा दिसला. त्याने त्याचा पाठलाग केला. तेव्हा लांडग्याची पिल्ले चपळ असल्यामुळे ती पळून गेली. पण त्यांच्याबरोबर खेळत असलेला मुलगा मात्र शिकाऱ्याच्या हातात सापडला. त्याने तो मुलगा घरी आणला. परंतू शिकाऱ्याला त्याचा कांहीच उपयोग नसल्याने व त्याला पोसणें शक्य नसल्याने शिकाऱ्याने मला तो दहा रुपयाला विकत दिला. मी गावोगावी त्याला घेऊन हिंडत असे. लांडग्याने पळवून नेलेला आणि लांडग्याच्या पिल्लांच्या सहवासात वाढलेला मुलगा म्हणून त्याला पहायला खूप लोक जमायचे, माझ्या थाळीत खुशीने पैसे टाकायचे. असाच एका गावी मी त्याला घेऊन गेलो

होतो. दुपारच्या वेळी झाडाला बांधून मी जरा चहाप्यायला म्हणून कोपऱ्यावरच्या हॉटेलात गेलो असतां कोणीतरी त्यालां दोर कापून पळवून नेले. परंतु तुमच्या येथील शेवटच्या पिंज-यात ठेवलेला मुलगा तोच माझ्याजवळ पूर्वी असलेला मुलगा आहे.'

मुख्य अधिकारी म्हणाला, 'कशावरून तू हे म्हणतोस?' दरवेशी म्हणाला, ' म्हणजे? तो इतके दिवस माझ्याजवळ होता. मी त्याला चांगला ओळखतो.'

मुख्य अधिकारी म्हणाला, 'तू जर म्हणतोस तुझ्या जवळच्या मुलालां कोणीतरीं पळवून नेले असले पाहिजे आणि आमच्या शेवटच्या पिंजऱ्यात ठेवलेला प्राणी तर आम्हाला जंगलात दूरवर सापडला. तेव्हा आमच्या पिंजऱ्यात ठेवलेला प्राणी, हा मुलगाच असावा असे तुला जे वाटते तो निव्वळ भास असावा. तू दुसरीकडे त्याचा शोध कर.'

मुख्य अधिकाऱ्याला, तो मुलगा दरवेशाजवळ पूर्वी असलेला मुलगा असावा ह्याची वास्तविक खात्री पटलेली होती. परंतु त्या परदेशी प्रवाशाकडून मिळणाऱ्या मोठ्या कमिशनची हाव होती म्हणून त्यांनी दरवेशाला टाळण्याचा प्रयत्न चालविला होता. मुख्यअधिकाऱ्याला दरवेशी म्हणाला, ' साहेब असे कसे होईल. मी पिंजऱ्यात पाहिल्याबरोबर त्याला ओळखला. त्याला पळवून नेणाऱ्याने आपल्याला त्याचा काही उपयोग नाही म्हणून सोडून दिला असेल. तेव्हा तोच मुलगा जंगलात पळून जात असताना तुम्हाला सापडला असेल. साहेब, ह्याच्यावर माझे पोट भागते. तुम्ही काही करुन माझा मुलगा मला परत द्या.'

त्यावर मुख्य अधिकारी रागाने उसळून, म्हणाला, 'तुला नीट समजावून सांगून कळत नाही. आम्ही हा मुलगा तुला देणार नाही.

काय वाटेल ते तू कर. जा चालता हो येथून.' आणि मग दरवेशी निराशेने तेथून परत गेला. जाता जाता तो, ' मी पोलीसांना कळवितो' असे पुटपुटला.

वरील प्रकार पाहून आपल्याला हा मुलगा सहजासहजी मिळणार नाही ह्याची डॉक्टरची खात्री पटली. परंतु दरवेशाने सांगीतलेल्या हकीगती वरून हा प्राणी-संग्रहालयाच्या पिंजऱ्यात असलेला मुलगा म्हणजे लांडग्यानें पळवून नेलेला, त्याच्या पिल्लांच्या सहवासात वाढलेला भालूच असला पाहिजे ह्याची त्यांची पक्की खात्री झाली. म्हणून काय वाटेल ते करून प्राणी-संग्रहालयातून त्या मुलाला परत मिळवायचे असे डॉक्टरने आपल्या मनाशी ठरविले. त्याने मुख्य अधिकाऱ्याला, ह्या मुलाला निर्मलाची खूप ओढ असल्याचे सांगीतले आणि म्हणून दोघांच्या सुखासाठी अम्हाला तो मुलगा योग्य त्या किंमतीला विकत द्यावा अशी काकुळतीने विनंती केली. परंतु पैशाच्या मागे लागलेला माणूसकोला पारखा झालेला असतो. ह्या न्यायाने ते मुख्य अधिकारी डॉक्टरना म्हणाले ' असे जर एक एक प्राणी आम्ही द्यायला लागलो तर आम्हाला आमचे प्राणी-संग्रहालय बंद करावे लागेल. माफ करा. आम्ही तो प्राणी विकत देऊ शकत नाही.' आणि मग डॉक्टर आणि अविनाश निराशेने घरी परत आले.

परंतु थोड्याच दिवसात डॉक्टरांच्या साह्याने आणि वकीलांच्या सल्ल्याने अविनाशनें प्राणीसंग्रहालयाच्या अधिकाऱ्या विरुद्ध आपला मुलगा परत मिळावा म्हणून फिर्याद केली. नेमकी त्याचवेळी, त्याच कारणासाठी, दरवेशानेंही फिर्याद केली. इतका गुंतागुंतीचा खटला न्यायधीशासमोर पूर्वी क्कचित्‌च आला असेल. त्यामुळे फिर्यादी, आरोपी, साक्षीदार, ह्यांचे जाब जवाब, वकीलांची भाषणे, ऐकल्यावर नेमका काय निर्णय द्यावा ह्याचा

न्यायाधीशांना उमज पडेना. अविनाश आणि निर्मला ह्यांचा मुलगा लांडग्यानेच पळवून नेला होता का? तोच मुलगा पुढे शिकाऱ्याला जंगलात सापडला का? दरवेशाच्या ताब्यात असताना कोणीतरी पळवून नेलेला मुलगाच पुढे प्राणीसंग्रहालयच्या अधिकाऱ्यांना जंगलात सापडला का? इत्यादी प्रश्न न्यायधीशांसमोर उभे राहिले. कारण ह्या बाबतीत निश्चित पुरावा त्यांच्यापुढे आलेला नव्हता. भालू हा स्वतः ह्या सर्व गोष्टीचा थोडासाच का होईना पुरावा देऊ शकला असता. पण त्याला बोलता येत नव्हते. न्यायधीशांना शिकाऱ्याची साक्ष प्रामाणीकपणाची वाटली. पण त्याहून मानसोपचार करणाऱ्या डॉक्टरांची साक्ष जास्त विचार करायला लावणारी वाटली. शिकाऱ्याच्या साक्षीवरून दरवेशाजवळचा मुलगाच प्राणी.संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांना जंगलात सापडला असावा असे सिद्ध होत होते. परंतु तो मुलगा दरवेशाचा स्वतःचा नव्हता. त्याने शिकाऱ्याकडून फक्त विकत घेतला होता. मग अविनाशची मागणी डावलून तो दरवेशाला देणे कितपत योग्य होईल? डॉक्टर आपल्या साक्षीत म्हणाले होते, 'आईला साहाजिकच अशी आपल्या मुला विषयीची ओढ असते, प्रेम असते. म्हणून मुलगा जरी वरकरणी कितीहो बदलला तरी ती त्याला ओळखू शकते. अर्थात् आपला मुलगा नाहीसा झाल्यानंतर त्याच्या भेटीसाठी उतावीळ झालेल्या आईला आपल्या मुलासारखा दुसरा मुलगा दिसल्यावर तो आपलाच मुलगा आहे असा भास होऊ शकेल. परंतु लहान पणीच नाहीशा झालेल्या मुलाला असा भास होऊ शकणार नाही. ज्या अर्थी ह्या विचित्र मुलाला निर्मलाताईंच्या बद्दल ओढ आणि आपुल्की आहे त्याअर्थी तो त्यांचाच मुलगा असला पाहिजे

विचार करता करता न्यायाधिशांच्या लक्षात आले की हा मुलगा कुणाच्या ताब्यात द्यावा ह्याचा विचार करताना आपण हा मुलगा अज्ञानी असल्यामुळे, ह्याचे हित आणि सुख कशात'

आहे ह्याचा मुळीच विचार केलेला नाही. म्हणून ते मुख्यतः पहाण्यासाठी आणि डॉक्टरनी आपल्या साक्षीत ह्या मुलाच्या मनात निर्मलाच्या बद्दल फार ओढ आणि आपुलकी आहे असे जे सांगीतले होते तें प्रत्यक्ष पडताळून पहण्यासाठी, निर्मला, तो मुलगा शिकारी, दरवेशी, आणि प्राणीसंग्रहालयाचा मुख्य अधिकारी ह्यांना कोर्टात हजर करण्यांस सांगीतले. त्याप्रमाणें सर्वांना कोर्टात हजर करण्यात आले.

न्यायाधीशाच्या सांगण्यावरुन भालूला प्रथम प्राणी-संग्रहालयाच्या मुख्य अधिकाऱ्याजवळ नेण्यात आले. भालूने त्यांच्याकडे वर मान करुन पाहिले आणि तो त्यांच्यापासून दूर पळून जाऊ लागला. त्याला नंतर दरवेशाजवळ नेण्यात आले. भालू लागलीच थरथर कापू लागला. विचित्र आवाज काढून ओरडू लागला आणि तेथून पळून जाऊ लागला. भालूला मग शिकाऱ्याजवळ नेण्यात आले. भालू त्याच्याकडे पाहून हसला आणि खाली मान घालून उभा राहिला. भालूला निर्मला जवळ नेत असताना त्याने तिच्याकडे झेप घेतली, तो आनंदाने नाचू लागला.. त्याने तिला मिठी मारली, तिचे पाय अश्रूंनी भिजवले. निर्मलाच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. न्यायाधिशांनी इतराच्या नकळत रुमालाने आपले अश्रू टिपले.


न्यायाधिशानी दोन चार दिवसांनी आपला निणर्य जाहीर केला. त्यांनी आपल्या निकाल पत्रात म्हटले होते, हा मुलगा आपलाच आहे ह्या संबंधी खात्रीशीर पुरावा कोणीच सादर करु शकले नाही. हा मुलगा लहान आणि अज्ञानी असल्यामुळे, ह्याचे हितआणि सुख कशात आहे हे पहाणे जास्त महत्वाचे आहे. ज्याअर्थीह्या मूलाला निर्मलाबद्दलआणि निर्मलाला ह्या मुलाबद्दल ओढ आणि प्रेम आहे, त्या अर्थी तिला ह्याचा ताबा देणेंच ह्या मुलाच्यादृष्टीने हितकारक आणि सुखकारक होईल. म्हणून हा मुलगा अविनाश आणि निर्मला ह्यांना देण्यात यावा असा निकाल मी

जाहीर करतो. ' अविनाश आणि निर्मला मग भालूला घेऊन घरी आले. भालू आई वडीलांच्या सावलीत विसावला, सुखावला. पण कॉलनीतल्या काही लोकांचा, विशेषतः काही बायकांचा भालू हा अविनाश आणि निर्मलाचा मुलगा असावा ह्यावर विश्वास बसत नव्हता. त्यामुळे भालूच्या संगतीत आपली मुले बिघडतील म्हणून त्यांना त्यांचे आईवडील भालूशी खेळावयाला पाठवत नसत, तर कॉलनीतील इतर मुले तो विचित्र बोलतो चालतो, म्हणून त्याला फिदीफिदी हसत. तर काही मुले भालूला दगड मारत.

डॉक्टरांना हे सर्व निर्मलाकडून समजले होते. काही दिवसांनी अविनाशनें भालू परत आला म्हणून सत्यनारायण केला. आणि त्या निमित्त कॉलनीतल्या सर्वांना फराळाला बोलाविले. त्याचवेळी आपल्या डॉक्टर मित्राचा सत्कार पण केला. सत्काराला उत्तर देताना डॉक्टर म्हणाले, ' निव्वळ योगायोगाने भालू आपल्या आई-वडीलांच्याकडे परत आला. अर्थात्‌त्यात माझा वाटा जवळ जवळ नाहीच. भालू इतका बदलला आहे की तो अविनाश निर्मला ह्यांचा लहानपणी हरवलेला मुलगा नसावा असे वाटणे सहाजीक आहे. परंतु लहानपणची बरीच वर्षे त्या लांडग्याच्या पिल्लांच्या सहवासात काढल्यामुळे तो त्यांच्यासारखा बोलतो चालतो. भालू हा धडधाकट दिसत असला तरी एकापरीने अपंगच आहे. आता प्रश्न आहे तो भालूला माणसात आणण्याचा, माणसा सारखा तो चालू बोलू लागून शिकून सवरून आपल्यापायावर उभा राहाण्याचा. ज्या वयात तुम्ही आपल्या घरात आई-वडीलांच्या सावलीत वाढत होतात त्या वयात भालू जंगली जनावरांच्या सावलीत त्यांच्या दयेवर जगत होता. म्हणून भालू तुम्हाला कितीही विचित्र वाटला तरी त्याला हसू नका, दगड मारु नका. ह्या मुलाच्या संगतीत कुणी बिघडणार तर नाहीतच. तर उलट त्यांच्या संगतीत हा त्यांचे अनुकरण करून लौकर चालू बोलू लागेल

ह्या अभागी मुलाला माणसात येण्यासाठी तुम्हा सर्वांच्या सहानुभूतीची आणि प्रेमाची अतिशय जरूरी आहे. कालांतराने भालू शिकून सवरून मोठा झाला. भालूनेच ही गोष्ट मला सांगितली. ह्या गोष्टीतील भाषा आणि शब्द भालूचेच आहेत. अक्षरे फक्त माझी आहेत.


म. वं. मं. [illegible], [illegible] शाखा.
[illegible]
दा. क्र. .......... दिनांक .......
विषय .......... क्र. ..........

BVBK-0401271